पुण्यनगरी



# लोकस्मृती वसतिगृहास सव्वापाच लाखांची देणगी

कोल्हापूर : येथील ज्येष्ठ नागरिक प्रा. अरविंद परांडेकर आणि त्यांच्या भगिनी कुंदा देशपांडे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी मंगळवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे अनुक्रमे ५ लाख आणि २५ हजार रुपयांच्या देणगीचे धनादेश सुपूर्द केले. प्रा. परांडेकर हे सध्या बाबूजमाल दर्ग्याजवळील परांडेकर वाडा येथे राहतात. सावंतवाडी येथील पंचम खेमराज महाविद्यालयात ते वनस्पतीशास्त्र विषयाचे प्राध्यापक होते. त्यांनी पत्नी अरुंधती परांडेकर यांच्या स्मरणार्थ देणगी दिली. बंधूंच्या प्रेरणेतून त्यांच्या भगिनी कुंदा देशपांडे यांनीही मातोश्री विमलाबाई परांडेकर यांच्या स्मरणार्थ देणगी दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव, फिरोझ नायकवडी, गिरीष सुर्वे, प्रियांका सुर्वे, राहुल शिंदे उपस्थित होते.

पुण्यनगरी

# जर्नालिझम, फोटोग्राफी, शॉर्टफिल्म मेकिंग कोर्सला प्रवेश सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात सुरू असलेल्या पी.जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम, सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी आणि सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्टफिल्म मेकिंग या तिन्हीही अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. हे तिन्हीही अभ्यासक्रम पार्टटाईम आहेत. इतर कोणताही पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकत असताना किंवा नोकरी आणि व्यवसाय करत हे अभ्यासक्रम पूर्ण करता येतात. विद्यापीठात फक्त शनिवार आणि रविवारी या कोर्सचे प्रशिक्षण दिले जाते. या तिन्हीही कोर्ससाठी वयाची कोणतीही अट नाही. या तीनही कोर्सबाबत अधिक तपशील हवा असल्यास विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा, असे आवाहन समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

18 JUN 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भावा-बहिणीकडून विद्यापीठास सव्वापाच लाखांची देणगी

लोकमत पॉझिटिव्ह स्टोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथील ज्येष्ठ नागरिक प्रा. अरविंद शंकर परांडेकर, त्यांच्या भगिनी कुंदा कृष्णकांत देशपांडे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे ५ लाख २५ हजार रुपयांच्या देणगीचा धनादेश सुपूर्द केला.

प्रा. अरविंद परांडेकर सध्या कोल्हापूरच्या बाबूजमाल दर्ग्याजवळील परांडेकर वाडा येथे राहतात. सावंतवाडी येथील पंचम खेमराज महाविद्यालयात ते वनस्पतीशास्त्र विषयाचे प्राध्यापक होते. त्यांनी पत्नी कै. अरुंधती यांच्या स्मरणार्थ लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी पाच लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश दिला.



शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी प्रा. अरविंद परांडेकर यांनी पाच लाखांच्या देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

बंधूंच्या प्रेरणेतून त्यांच्या भगिनी कुंदा देशपांडे यांनीही मातोश्री विमलाबाई शंकर परांडेकर यांच्या स्मरणार्थ विद्यार्थिनी वसतिगृहासाठी २५ हजार रुपयांच्या देणगीचा धनादेश दिला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. गिरीष कुलकर्णी, रणजीत यादव, फिरोझ नायकवडी, गिरीष सुर्वे, प्रियांका सुर्वे, राहुल शिंदे उपस्थित होते.

लोकमत

# विद्यार्थ्यांनी पटकावली ३७ लाखांची शिष्यवृत्ती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून दिली जाणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती ५०१ पात्र विद्यार्थ्यांनी मिळवली असून, ३७ लाख ७५ हजार रुपयांच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीचे सोमवारी वितरण करण्यात आले. २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात या शिष्यवृत्तीसाठी संलग्नित महाविद्यालये-पदव्युत्तर अधिविभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या १९३७ अर्जामधून पात्र ठरलेल्या एकूण ५०१ विद्यार्थ्यांना ३७ लाख त्यांच्या बँक खात्यात वितरित करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 JUN 2025

महा न्यूज & व्ह्यूज




# ज्येष्ठ भावा-बहिणीकडून लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहास देणगी



**कोल्हापूर (महान्यू अँड व्ह्यूज):**

येथील ज्येष्ठ नागरिक प्रा. अरविंद शंकर परांडेकर आणि त्यांच्या भगिनी श्रीमती कुंदा कृष्णकांत देशपांडे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी आज कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे अनुक्रमे ५ लाख आणि २५ हजार रुपयांच्या देणगीचे धनादेश सुपूर्द केले.

प्रा. अरविंद परांडेकर हे सध्या कोल्हापूरच्या बाबूजमाल दर्ग्याजवळील परांडेकर वाडा येथे राहतात. सावंतवाडी येथील पंचम खेमराज महाविद्यालयात ते वनस्पतीशास्त्र विषयाचे प्राध्यापक होते. सन २००५ मध्ये ते सेवानिवृत्त झाले आहेत. परांडेकर यांनी आपली पत्नी कै. अरुंधती अरविंद परांडेकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृहासाठी पाच लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश दिला. बंधूंच्या प्रेरणेतून त्यांच्या भगिनी श्रीमती कुंदा कृष्णकांत देशपांडे यांनीही मातोश्री कै. विमलाबाई शंकर परांडेकर यांच्या स्मरणार्थ विद्यार्थिनी वसतिगृहासाठी २५ हजार रुपयांच्या देणगीचा धनादेश दिला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी प्रा. परांडेकर यांच्याकडून देणगी निधीचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार केला, तसेच त्यांचा ग्रंथभेट देऊन गौरवही केला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजीत यादव, फिरोझ नायकवडी, गिरीष सुर्वे, प्रियांका सुर्वे, राहुल शिंदे उपस्थित होते.

लोकस्मृती वसतिगृह संकल्पनेविषयी...

शिवाजी विद्यापीठाने लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह हा सुमारे शंभर विद्यार्थिनींच्या निवास व्यवस्थेसाठीचा प्रकल्प प्रस्तावित केला आहे. हे वसतिगृह लोकांच्या सहभागातून उभारावे आणि त्यातून लोकांच्या स्मृती जतन केल्या जाव्यात, अशा हेतूने विद्यापीठाने या वसतिगृहाची संकल्पना मांडली. लोकांनी आपले कुटुंब, आप्तस्वकीय यांमधील प्रिय व्यक्तीच्या नावे ठराविक निधी विद्यापीठाकडे द्यावयाचा आणि त्या व्यक्तीच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करावयाची, अशी ही संकल्पना आहे. दानशूर नागरिकांच्या देणगीमधून वसतिगृहाच्या तळमजल्याचे काम पूर्णत्वाकडे असून आता वरील मजल्याचे बांधकाम करण्यात येत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
18 JUN 2025

वामाक्षी
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nevvit Comal Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेविषयी शनिवारी शिवाजी विद्यापीठात मार्गदर्शन सेमिनार

कोल्हापूर ( महान्यू अँड व्ह्यूज):

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता अभियांत्रिकी पदवी (प्रथम व द्वितीय वर्ष) तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात येत्या शनिवारी (दि. २१) सकाळी १०.३० वाजता प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन सेमिनार आयोजित करण्यात आला आहे. हा सेमिनार तंत्रज्ञान अधिविभाग सभागृहात पार पडणार आहे. ही माहिती तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी दिली आहे.

या मार्गदर्शन चर्चासत्रात विद्यार्थी व पालकांना अभियांत्रिकी म्हणजे काय, अभ्यासक्रमाचे स्वरूप, विविध शाखांची निवड कशी करावी, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, त्या अनुषंगाने होणारे बदल, भविष्यातील रोजगार व उच्च शिक्षणाच्या संधी, विविध स्कॉलरशिप, विद्यापीठाच्या विविध योजना, सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठीच्या योजना आदींविषयी समग्र मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यासाठी लागणारी कागदपत्रे आणि प्रवेश प्रक्रियेचे स्वरूप याविषयी माहिती देऊन शंकानिरसन केले जाईल.

तंत्रज्ञान अधिविभागामध्ये अभियांत्रिकीच्या विविध शाखांचे उच्चशिक्षण दिले जाते. पदवी स्तरावर कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी, केमिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या शाखांचा समावेश आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी, एनर्जी टेक्नॉलॉजी, एनव्हायर्नमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी या शाखांचा समावेश आहे. अभियांत्रिकीमध्ये पी.एचडी. करण्याचीही संधी येथे उपलब्ध आहे.

या अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन सेमिनारचा विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा आणि अधिक माहितीसाठी (०२३१) २६०९४२४ / २६०९४१४ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. कोळेकर यांनी केले.

पुढारी



कोल्हापूर : तंत्रज्ञान अधिविभागातील बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत संचालक डॉ. अजित कोळेकर, डॉ. राजन पडवळ, डॉ. गणेश पाटील व शिक्षक. (छाया : अर्जुन टाकळकर)

# शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागामधील १८० विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांत निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधील २०२४-२५ यावर्षी १८० विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्हमधून विविध राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विविध पदांवर निवड झाली आहे. विद्यापीठ केंद्रीय रोजगार कक्ष व तंत्रज्ञान अधिविभागाचा रोजगार कक्ष यांच्या मदतीने अनेक कंपन्यांमार्फत विभागात कॅम्पस ड्राईव्ह घेण्यात येतो. विद्यार्थ्यांना तांत्रिक विषयावर व्याख्याने, चर्चासत्रे, करिअर कौन्सिलिंग, व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम व कार्यशाळांचे आयोजन केले जाते. प्रत्येक विद्यार्थ्यास १२० तासांचे मोफत प्रशिक्षण दिले जाते. अभियांत्रिकीमधील आधुनिक अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते. त्यामुळे यंदा अनेक विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर, शिवाजी विद्यापीठ प्रशिक्षण व रोजगार कक्ष अधिकारी डॉ. राजन पडवळ, अधिविभागाचे प्रशिक्षण व रोजगार कक्ष अधिकारी डॉ. गणेश पाटील, शामल पवार यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

पुढारी

# विद्यापीठाकडून ४९९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ४९९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बीए बीकॉम, बीएस्सी, बीसीए, बीबीए, बीफार्मसी आदी १० अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला ४ हजार विद्यार्थी उपस्थित होते. दि. १७ रोजी पी जी डिप्लोमा इन बँकिंग अँड फायनान्स, एमए (इतिहास) आदी १२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक यांनी दिली.

सकाळ

# विद्यापीठात शनिवारी 'योग संगम'

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात शनिवारी (ता. २१) सकाळी सव्वासहा वाजता योग संगम कार्यक्रम होणार आहे. विद्यापीठातील राजमाता जिजाऊ साहेब सभागृहामधील या कार्यक्रमास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित असणार आहेत.

सकाळ

# विद्यापीठात शनिवारी 'अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया' सेमिनार

कोल्हापूर : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता अभियांत्रिकी पदवी (प्रथम व द्वितीय वर्ष) तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात शनिवारी (ता. २१) सकाळी साडेदहा वाजता प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन सेमिनार होणार आहे. या सेमिनारमध्ये विद्यार्थी व पालकांना अभियांत्रिकी म्हणजे काय, अभ्यासक्रमाचे स्वरूप, विविध शाखांची निवड कशी करावी, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, त्या अनुषंगाने होणारे बदल, भविष्यातील रोजगार व उच्च शिक्षणाच्या संधी, विविध स्कॉलरशिप, विद्यापीठाच्या विविध योजना, सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठीच्या योजना आदींविषयी समग्र मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यासाठी लागणारी कागदपत्रे आणि प्रवेश प्रक्रियेचे स्वरूप याविषयी माहिती दिली जाईल. विद्यार्थी, पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी केले.

तरुण भारत

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेविषयी शनिवारी विद्यापीठात शिबिर

▪ तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शैक्षणिक वर्ष २०२५२६ करिता अभियांत्रिकी पदवी (प्रथम व द्वितीय वर्ष) तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यामुळे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात शनिवारी २१ जून रोजी सकाळी १०.३० वाजता प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन शिबिर होणार आहे, अशी माहिती तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी दिली.

विद्यार्थी व पालकांना अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे स्वरूप, शाखांची निवड कशी करावी, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, त्या अनुषंगाने होणारे बदल, भविष्यातील रोजगार व उच्च शिक्षणाच्या संधी, विविध शिष्यवृत्ती, विद्यापीठाच्या विविध योजना, सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठीच्या योजना या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. तंत्रज्ञान अधिविभागामध्ये अभियांत्रिकीच्या विविध शाखांचे उच्चशिक्षण दिले जाते. पदवी स्तरावर कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी, केमिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या शाखांचा समावेश आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी, एनर्जी टेक्नॉलॉजी, एनव्हायर्नमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी या शाखांचा समावेश आहे. अभियांत्रिकीमध्ये पी.एचडी. करण्याचीही संधी येथे उपलब्ध आहे.

या अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन शिबिरासाठी जास्तीत जास्त विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. कोळेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष

18 JUN 2025 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'तंत्रज्ञान'च्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय कंपन्यांत निवड




**कोल्हापूर : विविध कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत सोबत संचालक डॉ. अजित कोळेकर, डॉ. राजन पडवळ, डॉ. गणेश पाटील आदी.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधील २०२४-२५ या वर्षी १८० विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राइव्हमधून विविध राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विविध पदांवर निवड झाली आहे. विद्यार्थ्यांना सर्वसाधारणपणे वर्षाला ३ ते १० लाख रुपयांपर्यंतचे पॅकेज दिले आहे.

शिवाजी विद्यापीठाचा केंद्रीय रोजगार कक्ष आणि तंत्रज्ञान अधिविभागाचा रोजगार कक्ष यांच्या मदतीने अनेक कंपन्यांमार्फत विभागात कॅम्पस ड्राइव्ह होत असून दरवर्षी प्रमाणे यंदाही मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. आणखीही अनेक कंपन्या प्लेसमेंटसाठी अधिविभागाला भेट देत आहेत. यामध्ये प्रामुख्याने इन्फोसिस, टी.सी.एस., विप्रो, पारी, डेटाटेक लॅब, सी.एम.एस. कॉम्प्युटर इंडिया लि., जयश्री इलेक्ट्रॉनिक्स, अमूल, नेस्ले इंडिया लि., ब्रिटानिया, अदानी ग्रुप, एल. कॉम. इंटरनॅशनल प्रा. लि., क्रायसो इंडिया लि., याशिवाय अन्य कंपन्यांचा समावेश आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन गुणवत्ता केंद्राचे काम चालते. अधिविभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर, शिवाजी विद्यापीठ प्रशिक्षण व रोजगार कक्ष अधिकारी डॉ. राजन पडवळ, अधिविभागाचे प्रशिक्षण व रोजगार कक्ष अधिकारी डॉ. गणेश पाटील, शामल पवार, सर्व शाखांचे समन्वयक कार्यरत आहेत.

- **विद्यार्थ्यांना ३ ते १० लाखापर्यंतचे पॅकेज**

तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत ४९९ अभ्यासक्रमांचे निकाल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बीए., बीकॉम, बीएस्सी., बीसीए, बीबीए, बी फार्म अशा १० अभ्यासक्रमाची १०९ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. ४ हजार ६ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. आतापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी ४९९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा झाला आहे.